19 JAN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव मंगळवारपासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

किर्लोस्कर उद्योग समूह आणि शिवाजी विद्यापीठ पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज' या प्रमुख विषयावरील 'किर्लोस्कर वसुंधरा आतंरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' मंगळवार (दि. २१) पासून शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव व डॉ. रसिया पडळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या महोत्सवात ५० हून अधिक लघपुट दाखवण्यात येणार असून सर्वांसाठी प्रवेश मोफत आहे. सकाळी ११ ते १.३० आणि संध्याकाळी ४.३० ते ५.३० वाजता चित्रपट प्रदर्शित केले जातील.

किर्लोस्कर वसुंधरा सन्मान पुरस्कार डॉ. एस. आर. यादव यांना, किर्लोस्कर वसुंधरा गौरव पुरस्कार डॉ. अनिलराज जगदाळे यांना, वसुंधरा मित्र पुरस्कार प्रा. नागेश दप्तरदार, अमोल बुद्धे आणि संपूर्ण अर्थ लाईव्हली हूड फाऊंडेशन यांना देण्यात येणार आहे. दि. २१ रोजी दुपारी 'कचरा व्यवस्थापन' या विषयावर चर्चासत्र, सायंकाळी ६ वाजता 'निसर्गायन' हा कार्यक्रम होणार आहे. दि. २२ रोजी दुपारी 'साकारू शाश्वत शहरे' या विषयावर चर्चासत्र, सायंकाळी ६ वाजता 'स्टँड अप कॉमेडी' होणार आहे. दि. २३ रोजी सकाळी ८ वाजता बोटॅनिकल गार्डन येथे अभ्यास भेट तर दुपारी ३ वाजता किर्लोस्कर वसुंधरा पुरस्कार वितरण होणार आहे. इको-बाजार आणि फोटो, रिल्स स्पर्धाही होणार आहे.

पत्रकार परिषदेस किर्लोस्कर उद्योग समूहाचे मानवसंधान विभागप्रमुख हरीश सैवे, वरिष्ठ सरव्यवस्थापक व्ही. एम. देशपांडे, सीएसआर प्रमुख, शरद आजगेकर व मोहन तायडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2025
सकाळ

# श्री शहाजी महाविद्यालयाचे बहिरेश्वरला मंगळवारपासून श्रमसंस्कार शिबिर

कोल्हापूर, ता. १८ : श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठतर्फे राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर बहिरेश्वर (ता. करवीर) येथे मंगळवार (ता. २१) ते सोमवारपर्यंत (ता. २७) होत आहे. 'शाश्वत विकासामध्ये युवकांचा सहभाग' असा शिबिराचा विषय आहे. जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल पाटील यांच्या हस्ते सायंकाळी सहा वाजता उद्घाटन होईल.

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, बहिरेश्वरच्या सरपंच वंदना दिंडे-पाटील, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, उपसरपंच रंगराव कामत, पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित राहतील. 'छत्रपती शिवरायांचे संघटनकौशल्य : आजची गरज' यावर विनायक रेडेकर, 'राष्ट्र उभारणीत युवकांचा सहभाग' यावर प्राचार्य डॉ. विलास पाटील, 'दुग्ध व्यवसायात तरुणांना रोजगाराच्या संधी' यावर अरविंद पाटील, 'महिला सक्षमीकरण' यावर डॉ. अक्षता गावडे यांचे व्याख्याने होईल. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले, जिल्हा बँकेचे संचालक बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर यांच्या उपस्थित समारोप होईल, असे समन्वयक डॉ. डी. एल. काशीद-पाटील, सहसमन्वयक डॉ. एन. डी. काशीद-पाटील, डॉ. एस. डी. जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2025

सकाळ

# ५१ हजार पदवी प्रमाणपत्रे 'डिजिलॉकर'वर उपलब्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात प्रदान करावयाची सर्व ५१ हजार ४९२ पदवी प्रमाणपत्रे समारंभ होताच नॅशनल अ‍ॅकॅडमिक डिपॉझिटरीच्या (डिजिलॉकर) पोर्टलवर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अपलोड करण्यात आली. यामध्ये पोस्टाद्वारे पाठवावयाच्या पदवी प्रमाणपत्रांचाही समावेश आहे. विद्यापीठाचा परीक्षा विभाग, संगणक केंद्रातर्फे सन २०२० पासून काम करण्यात येत आहे. विद्यापीठात २०२० मध्ये नॅशनल अ‍ॅकॅडमिक डिपॉझिटरी कक्ष सुरू झाला. या कक्षातर्फे सन २००१ ते २०२४ या कालावधीतील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची १०,०३,१९० इतकी प्रमाणपत्रे या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहेत.